ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 5434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ हि धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १९ | पुणें, बुधवार तारीख २२ एप्रिल, १९५३ | अंक १६

## विविध माहिती

**उत्तर-प्रदेशांत घोड्यांची पैदास**—उत्तर प्रदेश सरकारनें उत्तम प्रतीच्या घोड्यांची पैदास करण्यासाठी सहा काठेवाडी घोड्या आणि एक घोडा विकत घेण्याचें ठरविलें आहे. राज्याच्या पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमानुसार गुरांच्या खात्याला १०,००० रुपयांची मदत मिळणार आहे., त्या रकमेंतून वरील पैदास-केंद्र चालू करण्यांत येत आहे.

**निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांची समाजसेवा**—हिंदी लष्करांतील एक अधिकारी श्री. शर्मा हे सेवानिवृत्तीनंतर हृषीकेश येथें एक आश्रम बांधून रहाणार आहेत. गेल्या वर्षींच स्थापण्यांत आलेल्या शिवानंद मेडिकल मिशनमध्यें ते काम करणार आहेत. ह्या संस्थेनें वैद्यकीय मदतीसाठी एक फिरती मोटार ठेवण्याचें ठरविलें आहे. ह्या गाडीला ५०,००० रुपये खर्च येईल. श्री. शर्मा ह्यांनीं लष्करांत ३८ वर्षें डॉक्टर म्हणून काम केलें आहे.

**तांदुळाची नवी जात**—अमेरिकेच्या शेतकी खात्यानें भाताची एक नवी जात शोधून काढली आहे. हें भात लावल्यास दर एकरीं अधिक पीक येतें आणि तें किडीला अधिक प्रतिकार करतें असें समजतें.

**अमेरिकेंतील अल्युमिनमचें उत्पादन**—अमेरिकेंत १९५२ सालीं १,८७,४६,४२,६९२ पौंड अल्युमिनम धातू तयार झाला. १९४३ सालीं अमेरिकेंत अल्युमिनमच्या उत्पादनाचा जास्तींत जास्त उच्चांक गांठण्यांत आला होता. त्यावेळीं ३,४०,००,००० पौंड उत्पादन झालें होतें.

**अशुद्ध पेट्रोलचें उत्पादन**—१९५२ च्या सप्टेंबर महिन्यांत जगांत अशुद्ध पेट्रोलचें उत्पादन दररोज १,२५,४९,००० पिपें होत असे. त्यांपैकी ६,५,१८,००० पिपें एकट्या अमेरिकेंत निर्माण होत असे.

**जमिनीच्या मालकीला मर्यादा**— म्हैसूरचें सरकार प्रत्येक नागरिकाला त्याच्या मालकीची किती जमीन ठेवतां येईल ह्या-संबंधी मर्यादा घालण्याचा विचार करींत आहे असें समजतें. एका व्यक्तीला जास्तींत जास्त १५० एकर जमीन ठेवूं देण्यांत येईल असा अंदाज करण्यांत येत आहे.

**विमानें उतरण्याचा मार्ग**— डमडम विमानतळावर विमानें उतरण्यासाठी एक नवा पट्टा बांधण्यांत आला आहे. ह्या पट्ट्याला ५५ लाख रुपये खर्च आला. त्याची लांबी ७,००० फूट असून विजेचा प्रकाश पाडण्यासाठी अद्यावत सोय करण्यांत आली आहे. ६०,००० पौंडांपर्यंत वजन घेऊन जाणाऱ्या विमानासाठी तो बांधण्यांत आला आहे.

**दुष्काळ फंडाला मदत**— सौराष्ट्रांतील दुष्काळ फंडाला सौराष्ट्र मिल ओनर्स असोसिएशननें ४१,००० रुपयांची देणगी दिली आहे. त्याचप्रमाणें कै. सरदार वल्लभभाई पटेल ह्यांच्या स्मारकनिधीलाहि ३९,००० रुपयांची देणगी देण्यांत आली आहे.

**अफगाणिस्तानला रशिआची मदत**— अफगाणिस्तानांत गहूं सांठविण्याचीं आधुनिक गुदामें बांधण्यास मदत करण्यासाठी ५ रशिअन तंत्रज्ञ काबूलला आले आहेत. सध्यांच्या राजवटीनें रशिअन मदत घेतल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे. गुदामें आंतील हवामान बिघडूं न देणारीं अशीं बांधण्यांत येणार आहेत.

**म्हैसूर राज्यांत सिगारेट्सवर कर**— म्हैसूर सरकारनें सिगारेट्स आणि सिगार्सवर मद्रास राज्याप्रमाणें कर घेण्याचें ठरविलें आहे. मद्रास राज्यांतील कर आणि म्हैसूर राज्यांतील कर ह्यांच्यांतील तफावत कमी करण्यासाठी कर बसविण्यांत आला आहे.

**रशिआंत कापडाच्या नव्या गिरण्या**—व्होल्गा नदीच्या कांठीं कॅमिशन शहराच्या जवळ एक मोठी कापडाची गिरणी उभारण्यांत येत आहे. ह्या गिरणींत रोज १० लाख मीटर उत्तम प्रतीचें कापड निघूं शकेल. ह्याशिवाय खेरसॉन, क्रॅस्नोडार्ट व स्टॅलिनाबाद ह्या शहरांतहि मोठ्या कापडाच्या गिरण्या बांधण्यांत येत आहेत. सर्व गिरण्या १९५६ मध्यें आपलें पूर्ण उत्पादन करूं लागतील.

**रशियांतील स्त्री-कामगार**— स्टालिन मोटारकार वर्क्समध्यें ४०,००० कामगार आहेत, त्यांपैकी ४०% स्त्रिया आहेत. कारखान्याच्या आवारांत ३८ मैल लांबीचें रेल्वेसाइडिंग आहे, ह्यावरून त्याच्या विस्ताराची कल्पना येईल. रशियांतील कारखान्यांतून स्त्री-कामगारांचें प्रमाण इतर देशांपेक्षा ज्यास्त आहे. कांहीं कारखान्यांत तें ५०% पेक्षाहि अधिक आहे.

**ग्रीक चलनाचें अवमूल्यन**—इंटर नॅशनल मोनेटरी फंडाच्या मंजुरीनें, ग्रीसनें त्याच्या चलनाची किंमत उतरविली आहे. पूर्वी १ डॉलर=१५,०.०० ड्रॅकमा अशी किंमत होती, ती आतां १ डॉलर=३०,००० ड्रॅकमा अशी करण्यांत आली आहे. इतर देशांच्या चलनाशीं नातेंहि ह्याच प्रमाणांत बदलण्यांत आलें आहे. युद्धसमाप्तीनंतर ग्रीसची मुक्तता झाल्यापासून त्यानें चलनाची किंमत उतरविल्याचा हा तिसरा प्रसंग आहे. ग्रीक मालाच्या निर्गतीस आतां उत्तेजन मिळेल अशी अपेक्षा आहे.

**राज्यारोहणाचे प्रसंगीं बांगड्यांची भेट**—राणी एलिझाबथला भारत सरकार राज्यारोहणाचे प्रसंगीं फेरोझाबाद येथें तयार केलेल्या बांगड्या भेट म्हणून देणार आहे.

### सरकारी रोखे-विक्रींत ३४¾ लक्ष रु. तोटा

गेल्या वर्षीं मद्रास सरकारनें मध्यवर्ती सरकारला ४ कोटि, ६२ लक्ष रुपयांचे भारत सरकारचे रोखे रिझर्व्ह बँकेच्या मार्फत विकले, त्यांत मद्रास सरकारला ३४¾ लक्ष रु. नुकसान सोसावें लागलें. भांडवली खर्च व दुष्काळनिवारणासाठी खर्च ह्यांमुळें मद्रास सरकारजवळ रोकड पैसा उरला नव्हता, मध्यवर्ती सरकार मदत करण्यास तयार नव्हतें आणि जॉइंट स्टॉक बँकांकडून ओव्हरड्राफ्ट घेतला तो १ कोटी रुपयांवर गेला नाहीं. बाजारांत कर्ज उभारणेंहि अशक्य होतें. म्हणून नाईलाज होऊन मद्रास सरकारनें तोटा सोसून सरकारी रोखे विकले.

### इं. फि. कॉर्पोरेशनच्या कारभाराची चौकशी

इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनसंबंधीं केलेल्या कांहीं तक्रारींची चौकशी करण्यासाठी श्री. सुचेता कृपलानी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमली होती. कमिटीचें चौकशीचें काम पुरें झालें असून तिचा रिपोर्ट ह्या महिनाअखेर सरकारला सादर होईल.

### स्विस घड्याळांची भारतांत चोरटी आयात

स्वित्झरलंडमधून भारतांत विमानांतून मोठ्या प्रमाणावर घड्याळांची चोरटी आयात केली जाते, अशी तक्रार "वॉचमेकर" ह्या स्विस पत्रानें केली आहे. १९५२ च्या प्रारंभापासून आतां-पर्यंत, सुमारें १८ महिन्यांत, फक्त ६० लक्ष फ्रँक किंमतीच्या स्विस घड्याळांच्या आयातीस भारत सरकारची परवानगी होती; परंतु हिंदी बाजारपेठेंत २ कोटी, ३० लक्ष फ्रँक्स किंमतीच्या घड्याळांस मागणी होती. कमी आयातीस परवाने, जबर ड्यूटी व कर, ह्यांमुळें चोरट्या आयातीस उत्तेजन मिळतें.

### "नेपा" गिरणीसाठी ६ कोटी रुपये

"नेपा" न्यूजप्रिंट कागदाच्या गिरणीस ३ कोटी रुपये लागतील, असा तिच्या मॅनेजिंग एजंटांचा अंदाज होता. ऑफ कमिटीच्या मतें तो ४ कोटी, ७२ लक्ष रुपये झाला. आतां तो ६ कोटी, ७२ लक्ष रुपये झाला आहे.


॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

— ता. ६ एप्रिल १९५३ पर्यंत —

नवीन १००० टनांच्या सेमिइलेक्ट्रिक मशिनरीनें

**८०,००० (ऐशीं हजार) पोतीं साखर तयार झाली आहे**

**★★ चालू हंगाम एप्रिलअखेरपर्यंत चालेल ★★**

पुढील हंगाम नोव्हेंबर १९५३ मध्यें सुरू होईल.

**★ ३ वर्षं मुदतीला ७ टक्के व्याज**

व

**★ १ वर्ष मुदतीला ६ टक्के व्याज**

अशा ठेवी घेण्याबद्दल संचालक मंडळानें ठराव केला आहे; त्याप्रमाणें ठेवी सिंडिकेट स्वीकारील.

सप्टेंबर १९५२ अखेरचा ताळेबंद, नफा-पत्रक व संचालकांचा अहवाल ता. १५ जून १९५३ पर्यंत भागीदारांना पाठविण्यांत येईल.

शेअरचे व ठेवींचे फॉर्म पुणें येथील सिंडिकेटच्या मुख्य कचेरींत मिळतील.

१८० सदाशिव पेठ,
पुणें २.
ता. ७-४-१९५३.

डॉ. व्ही. डी. फाटक
अध्यक्ष.

# अर्थ

बुधवार, ता. २२ एप्रिल, १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## औद्योगीकरणास मानवी श्रद्धा आणि प्रयत्न ह्यांची आवश्यकता

व्हाइसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलांतील अर्थमंत्री म्हणून १९२८ ते १९३४ काम केलेले सर जॉर्ज शूस्टर हे भारतांत नुकतेच येऊन गेले. फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीनें त्यांना मुद्दाम बोलाविलें होतें. पंचवार्षिक योजनेंत उद्योगधंद्यांना जरा दुय्यम स्थान देण्यांत आलेलें आहे, तें कितपत वाजवी आहे ह्याविषयीं फेडरेशनला स्वतंत्र तज्ज्ञाचा सल्ला हवा होता. सर जॉर्ज शूस्टर ह्यांनीं लंडन येथें ईस्ट इंडिया असोसिएशन व ओव्हरसीज लीग ह्यांच्या वतीनें भरविण्यांत आलेल्या संयुक्त सभेंत हिंदी आर्थिक प्रश्नांचा आढावा घेतला. नियोजन मंडळानें पहिल्या पांच वर्षांत शेतीवर भर देण्यांत समयज्ञता व धाडस दाखविल्याबद्दल "इकॉनॉमिस्ट"नें त्यांचें अभिनंदन केलें आहे. शेतीची आबाळ झाली तरी चालेल, पण उद्योगधंद्यांची वाढ केली पाहिजे, ही कल्पना आज दृढमूल असली, तरी भारताच्या विशिष्ट परिस्थितींत औद्योगीकरणाची वाढ हळूहळू व भक्कम शेतीच्या पायावरच झाली पाहिजे, ह्या तत्त्वास सर जॉर्ज शूस्टर ह्यांनीं पाठिंबा दिला आहे. पहिल्या पांच वर्षांचा काळ पुढील औद्योगीकरणाच्या पूर्वतयारीचा काळ आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

सर जॉर्ज शूस्टर ह्यांच्या मतें, औद्योगिक प्रगति चार महत्त्वाच्या गोष्टींवर अवलंबून आहे:—माणसें, कच्चा माल, यंत्रसामुग्री व पैसा. ह्यांपैकी शेवटच्या तीन गोष्टी कितीहि मोठ्या प्रमाणांत मिळाल्या, तरी मानवी प्रयत्नांच्या अभावीं प्रगति होऊं शकणार नाहीं. योग्य प्रकारच्या मानवा उद्देशांस प्रोत्साहन मिळालें पाहिजे व मानवी प्रयत्न प्रभावी केले पाहिजेत. विकासयोजनांसारख्या योजनांचे द्वारां खेडेगांवांतील जनतेचा उत्साह वाढविला पाहिजे व त्यांच्यामध्यें काम करण्यास चेतना निर्माण केली पाहिजे. हिंदी उद्योगपतींनीं विकासयोजनांस आपण होऊन हातभार लावला पाहिजे; खेडेगांवी जनतेची क्रयशक्ति वाढण्यावरच उद्योगपतींच्या कारखान्यांत तयार होणाऱ्या मालास बाजारपेठ मिळणें अवलंबून रहाणार आहे.

पंचवार्षिक योजनेप्रमाणें, राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५% एवढी रक्कम भांडवल निर्मितीस उपलब्ध होऊं शकेल. हें प्रमाण, योजनेचा फायदा जसजसा पदरांत पडेल तसतसें वाढत जाईल अशी अपेक्षा आहे. उद्योगधंद्यांची वाढ होण्यास भांडवलाचा ह्या गतीनें होणारा संचय पुरा पडणार नाहीं. म्हणून, औद्योगीकरणास जोराची चालना देण्यासाठी बाहेरील भांडवलाची मदत लागेल. प्रारंभींच्या काळांत परदेशी भांडवलाचें साहाय्य घेणें अपरिहार्य आहे; त्याच्या अभावीं औद्योगीकरणास गतीच मिळणार नाहीं, असा सर जॉर्ज शूस्टर ह्यांचा अभिप्राय आहे.

औद्योगीकरणाच्या खासगी प्रयत्नांना भारत सरकारनें पुरेसा मोठा वाव ठेवलेला आहे आणि स्वतःकडे नियंत्रणाचे भरपूर अधिकार राखून ठेवले आहेत. उद्योगपती व सरकार ह्यांनीं एकमेकांस विश्वासांत घेतलें पाहिजे आणि त्यांनीं एकमेकांशीं वारंवार विचारविनियम केला पाहिजे. कारखान्यांची कार्यक्षमता वाढविल्याखेरीज, कारखानदारांबद्दल सरकारला व जनतेला जिव्हाळा वाटणार नाहीं. ग्रेट ब्रिटनमध्यें कारखानदारांनीं कार्यक्षमता वाढविण्यासाठी काय काय गोष्टी केल्या, त्याचा हिंदी उद्योगपतींनीं काळजीपूर्वक अभ्यास केला पाहिजे. कामगारसंघांकडे पहाण्याचा त्यांचा दृष्टिकोनहि सुधारला पाहिजे. भारतांतील कामगारसंघांची वृत्ति जेवढी जबाबदारीची असावयास पाहिजे तेवढी ती नाहीं हें मात्र मान्य केलें पाहिजे. ह्यासंबंधांत पुष्कळच प्रयत्नांस वाव आहे.

हिंदी जनतेची परिस्थिति इतकी हलाखीची आहे कीं, लोकांनीं कंबर कसून कष्ट करण्यावरच त्यांचें सारें जीवनहि अवलंबून आहे. हा साधा जगण्या-मरण्याचा प्रश्न आहे. तेव्हां, उत्पादनवाढीचा व औद्योगीकरणाचा प्रश्न भारतांत अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. पुरेशी प्रगति झाली नाहीं, तर चैनी कमी होणार नसून जीवितावरच गदा येण्याची भीति आहे, इतकी गंभीर परिस्थिति आहे. दुर्दैवानें ह्याची जाणीव जितक्या तीव्रतेनें लोकांस असावयास पाहिजे, तेवढी नाहीं आणि लोकांच्या प्रयत्नांसहि उत्साहाची व निष्ठेची जोड मिळालेली नाहीं. सर जॉर्ज शूस्टर ह्यांनीं प्रगतीस आवश्यक म्हणून ज्या चार गोष्टी सांगितल्या, त्यांतील मानवी भागाचें महत्त्व फारच मोठें आहे. तेव्हां, लोकांना परिस्थितीची जाणीव करून देऊन त्यांचेमध्यें आत्मविश्वास निर्माण करण्याकडे जाणत्या लोकांचें लक्ष लागून राहिलें पाहिजे; विध्वंसक गोष्टी शक्य तों टाळल्या पाहिजेत.

**भविष्यकालांतील अजब कारखाने**—केवळ थोडीं बटनें दाबून चालवितां येणारे स्वयंचलित कारखाने निघूं शकतील येवढी प्रगति आतां विज्ञानाची झाली आहे. फक्त ते आर्थिक दृष्ट्या नफ्याचे होतील किंवा नाहीं ह्याविषयीं उद्योगपतींची खात्री होण्याचेंच काय तें बाकी आहे. अशा प्रकारच्या नव्या कारखान्यांतून माणसें फारच कमी लागतील.

**६० लाख रुपयांची देणगी**—रांची येथें तांत्रिक शिक्षणाची एक संस्था काढण्यासाठी हिंदुस्थान चॅरिटी ट्रस्टनें ६० लाख रुपयांची रक्कम बाजूला काढून ठेवली आहे. विहार राज्यसरकारनें असें सुचविलें आहे कीं, ह्या रकमेचा उपयोग करून एक पॉलिटेकनिक काढण्यांत यावें आणि त्यांत ३०-३५ उद्योगधंद्यांचें व कला-कारागिरीचें शिक्षण देण्यांत यावें. ग्रामोद्योगांना उपयोगी पडतील अशीं यंत्रें बनविण्यासाठी एक संशोधन केंद्रहि स्थापण्याचा घाटत आहे.

**स्वीडन-रशिआ व्यापारी करार**—स्वीडन आणि रशिया ह्या देशांनीं एक वर्ष मुदतीच्या व्यापारी करारावर नुकत्याच सह्या केल्या. कराराच्या शर्तीप्रमाणें एका वर्षांत उभयता राष्ट्रांनीं परस्परांत ७·५ कोटी क्राऊन्स म्हणजे सुमारें ६९३ लाख रुपये किंमतीच्या मालाची देवाण-घेवाण करावयाची आहे.

## एक्सचेंज बँक प्रकरणांतील तडजोड कायदेशीर
### डायरेक्टरांवरील जबाबदारीची वाटणी

एक्सचेंज बँक ऑफ इंडिया अँड आफ्रिका जून, १९४९ मध्यें गुंडाळण्यांत आली. त्यानंतर ऑफिशिअल लिक्विडेटरनें बँकेचे डायरेक्टर्स व ऑडिटर्स ह्यांवर 'मिसफीजन्स समन्स' काढून त्यांचेकडून १९६ लक्ष रुपये वसूल करण्याचा कायदेशीर मार्ग पत्करला. त्यांनीं कायदेशीर अधिकाराचें उल्लंघन केलें व निष्काळजीपणा केला, त्यामुळें बँकेचें झालेलें हें नुकसान त्यांनीं भरून द्यावें असें ऑफिशिअल लिक्विडेटरचें म्हणणें. न्यायमूर्ति तेंडोलकर ह्यांचेपुढें हें समन्स निवाड्यासाठीं आलें, तेव्हां डायरेक्टरांपैकीं सहा जणांनीं समन्स रद्द करण्याच्या अटीवर २० लक्ष रुपये लिक्विडेटरला देऊं केले. कोर्टाची मंजुरी असेल तर ही रक्कम स्वीकारूं, असें लिक्विडेटरनें त्याच्या वकिलामार्फत कोर्टास सांगितलें. २० लक्ष रुपयांची वेगवेगळ्या प्रतिवादींत वाटणी श्री. जमशेटजी कांगा ह्यांनीं करावी, आणि आनंद जी. शहा ह्यांच्या वाट्याच्या रकमेस वाडीलाल चतुर्भुज गांधी ह्यांनीं गॅरंटॅर रहावें, अशी अट ठरली होती. न्या. कोयाजी ह्यांनीं तडजोडीस मान्यता दिल्यावर, श्री. कांगा ह्यांनीं कर्जाच्या रकमेची वाटणी केली, त्यांत आनंद जी. शहा ह्यांचेवर ३,६०,००० रु. ची व वाडीलाल गांधी ह्यांचेवर २,३०,००० रु. ची जबाबदारी पडली. पुढें गांधी ह्यांनीं तडजोडींतून अंग काढून घेतलें, तेव्हां रेस्पॉंडंट्सपैकीं एक ठाकोरलाल मुनशी ह्यांनीं तडजोड रिकॉर्ड करावी असा अर्ज केला. त्याचा निकाल करतांना न्या. तेंडोलकरांनीं तडजोड कायदेशीर आहे असें सांगून त्यानुसार डिक्री काढली. शहा आणि गांधी ह्यांच्या वांट्यास श्री. कांगा ह्यांनीं घातलेल्या रकमेची डिक्री निघाली. वाडीलाल गांधींनीं त्यावर अपील केलें, तें हायकोर्टानें नामंजूर केलें.

### रिझर्व्ह बँक—मध्य प्रदेश करार

रिझर्व्ह बँक आणि मध्य प्रदेश सरकार ह्यांचेमधील नवीन कराराप्रमाणें, मध्यप्रदेश सरकारनें रिझर्व्ह बँकेंत किमान २० लक्ष रुपये ठेव राखली पाहिजे; १९३७ च्या कराराप्रमाणें १० लक्ष रुपयांची किमान ठेव आवश्यक होती. मध्यप्रदेश सरकारला ह्या ठेवीच्या दुप्पट म्हणजे ४० लक्ष रु. 'वेज आणि मीन्स' कर्ज रिझर्व्ह बँकेकडून मिळूं शकेल; पूर्वी ३० लक्ष रुपयांपर्यंत मिळे. व्याजाचा दर बँकरेटपेक्षा अर्धा टक्का कमी, एवढा राहील. रिझर्व्ह बँकेनें मध्यवर्ती सरकारच्या, राज्य सरकारच्या मालकीच्या, रेल्वेचे तारणावर २ कोटि रुपयांपर्यंत कर्ज देण्याचें कबूल केलें आहे. व्याजाचा दर कर्जाच्या रकमेवर अवलंबून राहील; म्हणजे कर्ज वाढलें कीं, व्याजाचा दर वाढत जाऊन बँकरेटच्या खालीं तीन चतुर्थांश टक्क्यांपासून बँकरेटपर्यंत क्रमाक्रमानें वाढेल.

### नॅशनल बँक ऑफ पाकिस्तान

नॅशनल बँक ऑफ पाकिस्तानला १९५२ मध्यें ५३,५०,००० रु. नफा झाला. १९५१ चे मानानें १९५२ मध्यें ठेवींत ८३ कोटी रुपयांची वाढ झाली.

### बँक ऑफ टोकिओ

बँक ऑफ टोकिओची शाखा कराची येथें नुकतीच उघडण्यांत आली. पाकिस्तान सरकारनें ह्या बँकेस शेड्यूल्ड बँक म्हणून मान्यता दिली आहे.

### फ्रेंच राष्ट्रीय बँकेनें सरकारला कर्ज नाकारलें?

फ्रेंच सरकार आणि राष्ट्रीय मालकीची बँक ऑफ फ्रान्स ह्यांच्यामधील संबंध चमत्कारिक झाले असल्याचें समजतें. बँक ऑफ फ्रान्स ही नोटा काढणारी बँक आहे. त्या बँकेनें आतांपर्यंत फ्रेंच सरकारच्या खजिन्याला बरींच कर्जें दिलेलीं आहेत. परंतु आतां बँक फ्रेंच सरकारला कर्ज देण्यास तयार नाहीं असें समजतें. सरकारी खजिन्याला हंगामी काळांत जो पैसा लागतो तो पुरविण्यासाठी फ्रान्सचे मुख्य प्रधान एम्. रेने मायर ह्यांनीं बँकेकडे १० अब्ज फ्रँक्सच्या कर्जाची मागणी केली. परंतु बँकेच्या बोर्डानें आतांपर्यंत दिला नव्हता असा जबाब देऊन कर्ज देण्याचें नाकारलें. फ्रान्स सरकारचें अंदाजपत्रक तोंडमिळविणीचें नाहीं. अंदाजपत्रकाची तोंडमिळवणी करण्यासाठी कांहीं मूलभूत सुधारणा कराव्या, असें पत्र बँकेचे गव्हर्नर एद्. विल्फ्रिड बॉम गार्टन ह्यांनीं फ्रेंच सरकारला पाठविलें आहे. ह्याविषयासंबंधीं बँकेच्या गव्हर्नराकडून १२ महिन्यांत हें तिसरें पत्र रवाना झालें आहे. ह्या सर्व प्रकरणांत एक गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. बँक ऑफ फ्रान्स ही राष्ट्रीयीकरण झालेली बँक असून ती सनदी नोकर, सरकारच्या मालकीच्या बँकांचे प्रमुख आणि सरकारी उद्योगधंद्यांचे प्रमुख ह्यांच्याकडून चालविली जाते. अर्थात् ह्या मंडळींनीं अंदाजपत्रकाची तोंडमिळवणी न झाल्यामुळें सरकारला कर्ज देण्याचें नाकारल्यास त्या सर्वांनाच कामावरून दूर करण्याचा अधिकार सरकारला आहे. पण फ्रान्समधील परिस्थिति लक्षांत घेतां बँकांचे प्रमुख व उद्योगधंद्यांचे प्रमुख ह्यांना लेखणीच्या एका फटकाऱ्यानें काढून टाकणें कठीण आहे. ह्या तेढीचे काय परिणाम होतात इकडे फ्रेंच जनतेचें लक्ष लागून राहिलें आहे.

### अमेरिकन लोक अधिक चहा घेणार

अमेरिकेंत अलीकडे चहाचा प्रसार वाढत्या प्रमाणावर होत आहे आणि युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका टी कौन्सिल ह्या संस्थेनें चालविलेले प्रयत्न यशस्वी झाले तर चहाचा खप आणखीही वाढेल. ही संस्था नफ्याच्या तत्त्वावर चालविली जात नाहीं. तिचे सभासद म्हणून भारत, सीलोन, इंडोनेशिआ व टी असोशिएशन ऑफ युनायटेड स्टेट्स ह्यांची नोंद झालेली आहे संस्थेची पहिली बैठक नुकतीच भरली होती. आंतरराष्ट्रीय व्यापारांत अशा प्रकारचें सहकार्य फारच क्वचित् दृष्टीस पडतें. ह्या बैठकींत चहाचा प्रसार व प्रचार करण्यासाठीं दरवर्षी ६०,००,००० रुपये खर्च करण्यांत यावेत, असें ठरविण्यांत आलें. ह्या रकमेपैकीं दोन तृतीयांश रक्कम चहा उत्पादन करणाऱ्या देशांनीं द्यावयाची असून उरलेली एक तृतीयांश अमेरिकन टी असोसिएशननें द्यावयाची आहे. १९५२ सालीं चहा पिकविणाऱ्या देशांनीं व त्याचा प्रसार करणाऱ्या देशांनीं मिळून चहाच्या खपासाठीं संयुक्त प्रयत्न केले. त्या प्रयत्नांवरून असें दिसून आलें कीं प्रसाराचे योग्य मार्ग स्वीकारले तर अमेरिकेंतील चहाचा खप अजूनहि पुष्कळ वाढवितां येईल. संस्थेची मुख्य कचेरी न्यूयॉर्क येथें आहे. नुकत्याच झालेल्या संस्थेच्या बैठकींत लिप्टन टी कंपनीचे मि. रॉबर्ट बी. स्मॉलवुड ह्यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यांत आली आहे.

### देशी व विदेशी शेड्यूल्ड बँकांचे तुलनात्मक आकडे
(२६-१२-५२ रोजींचे)

| शेड्यूल्ड बँका | ठेवी (कोटी रु.) | गुंतवणूक (कोटी रु.) | कर्जें (कोटी रु.) |
|---|---|---|---|
| विदेशी | १७२·९६ | ४५·९२ | १२६·५२ |
| देशी | ६४८·०३ | २०१·५३ | ३४१·७६ |

### कामगार काढण्यास ट्रायब्यूनलची मान्यता

मुद्दाम मंद गतीनें काम करणाऱ्या दोन नोकरांना कामावरून काढून टाकण्यास फायरस्टोन टायर अँड रबर कंपनीला लेबर अपेलेट ट्रायब्यूनलनें परवानगी दिली. हे दोघे कामगार पूर्वी दररोज २२ आणि १८ टायर्स करीत असत; त्यांनीं आपलें उत्पादन प्रत्येकीं ८ टायर्सवर आणलें होतें. दोन्ही कामगारांना पीस–वर्क पद्धतीनें मजुरी दिली जात होती हें खरें असलें तरी त्यांनीं मुद्दाम उत्पादन कमी करणें चूक आहे, असा अभिप्राय ट्रायब्यूनलनें व्यक्त केला. टायर्स किती तयार करतात ह्यावर महागाई भत्ता अवलंबून नव्हता; तो रोजच्या हजेरीवर अवलंबून होता. एकाद्या कामगारानें यंत्र अडवून ठेवावें, रोजचा भत्ता मिळवावा आणि उत्पादन मात्र मर्जीप्रमाणें वाटेल तेवढें कमी करावें, हें हास्यास्पद आहे, असें ट्रायब्यूनलनें नमूद केलें.

### खोबरें आणि खोबरेल तेलाचें उत्पादन

भारतामधील खोबरें आणि खोबरेल तेल ह्यांच्या उत्पादनाचा अंदाज इंडिअन सेंट्रल कोकोनट कमिटीनें केला आहे. कमिटीच्या मताप्रमाणें खोबरें आणि खोबरेल तेलाचें उत्पादन भारताच्या गरजेपेक्षां २० ते २५ टक्क्यांनीं कमी झालें आहे. १९४९–५० सालीं भारतांत ३३,९९० लाख नारळांचें उत्पादन झालें असा कमिटीचा अदमास आहे. ह्या सर्वच नारळांचें खोबरें करण्यांत आलें असें मात्र नव्हे. सुमारें १५,६३५ लाख नारळांचें म्हणजे एकूण उत्पादनाच्या ४६ टक्के नारळांचें खोबरें करण्यांत आलें. खोबऱ्याच्या एकूण उत्पादनापैकीं २१ टक्के उत्पादन प्रत्यक्ष खाण्यासाठींच वापरण्यांत आलें. एकूण उत्पादनापैकीं २,८१,६५२ टन खोबरेल तेल काढण्यासाठीं मिळालें. ह्या खोबऱ्यापासून १,१२,६२४ टन खोबरेल तेल तयार झालें. नारळांच्या एकूण उत्पादनापैकी ५४ टक्के नारळ खाण्यासाठीं वापरण्यांत येतात. ह्या हिशेबांत शहाळ्यांचाहि खप जमेस धरण्यांत आला आहे. त्याशिवाय त्यांपैकीच कांहीं नारळ बियाणें म्हणून वापरले जातात किंवा लग्नकार्यासारख्या धार्मिक विधींत अगर देवापुढें वापरण्यांत येतात.

### जपानमध्यें १०० रु. प्राप्तीस इनकमटॅक्स

जपानमधील युद्धजन्य नुकसानी आतां पूर्णपणें दुरुस्त झाली आहे; ह्या प्रगतीचें मुख्य श्रेय जपानी लोकांच्या संघटना-चातुर्यास आहे. जपानमध्यें आज अन्नाचा तुटवडा व लोकसंख्येची वाढ हे मोठे बिकट प्रश्न आहेत. तेथील शेतीची उत्पादनक्षमता फार मोठी आहे. लोखंड, कोळसा, कपास, इत्यादि कच्च्या मालाचा तेथें तुटवडा आहे. त्यामुळें त्यांची आयात बेसुमार किंमत देऊनहि करावी लागते. जपानी कापडाचा धंदा पूर्वीसारखा जोमास लागला आहे. तेथील प्राप्तीवरील कराचा बोजा फारच मोठा आहे. ७,००० येन (१०० रु.) वार्षिक प्राप्ति असणारासहि इन्कमटॅक्स द्यावा लागतो.

### बेकार वाढले, नोकऱ्या कमी झाल्या

मुंबई राज्यांतील रोजगाराची परिस्थिति बिघडत चालली आहे. येथील एम्प्लॉयमेंट एक्सचेंजेसमार्फत १९५३ च्या पहिल्या तिमाहींत ३,९५७ लोकांना नोकऱ्या मिळूं शकल्या; १९५२ च्या पहिल्या तिमाहींत ती संख्या ११,३९३ होती. ६२,००० बेकार एक्सचेंजेसच्या मार्फत नोकरी मिळण्याची वाट पहात आहेत आणि नोकर–कपातीमुळें त्यांत प्रत्यहीं भर पडत आहे.

### श्री, श्रीमती व कुमारी

मद्रास सरकारनें सरकारी पत्रव्यवहारांत जात, धर्म, इत्यादींचा विचार न करतां सर्वांना श्री, श्रीमती किंवा कुमारी ह्यांपैकी उपपद लावण्याचें ठरविलें आहे. फर्म्स व कंपन्या ह्यांना लिहितांना मेसर्सच्या ऐवजीं श्री. लिहिलें जाईल.

**डेहराडून तुरुंगाचें ऐतिहासिक महत्त्व**— डेहराडून येथील तुरुंगांतील ज्या भागांत पं. नेहरूंना एकदां अडकावून ठेवलें होतें तो भाग ऐतिहासिक स्मारक म्हणून राखण्यांत येणार आहे असें समजतें. तुरुंगांत पं. नेहरूंनीं १९३९ सालीं लावलेलें एक तुतीचें झाड अद्यापहि आहे. ह्याच तुरुंगांत पं. नेहरूंनीं 'ग्लिम्सेस ऑफ वर्ल्ड हिस्ट्री' ह्या ग्रंथाचा बराच भाग लिहून काढला.


## THE MADHYA PRADESH CO-OPERATIVE BANK LTD.

***NEAR TILAK STATUE***

**NAGPUR**

## Best Opportunity For Investors

### 4% Debentures for Rs. 12,00,000/-

To be issued AT PAR.
Principal and Interest guaranteed by State Government
Interest payable half yearly

Applications for subscription are invited
from 15th May, 1953.

***For copies of Prospectus apply to:—***

Nagpur } **N. S. DEO,** *Manager.*

## बँकांच्या ठेवींशीं कांहीं प्रमाणें

बँकांचें एकूण उत्पन्न व निरनिराळ्या महत्त्वाच्या सात्यांत होणारे सर्च यांचें एकूण ठेवींशीं शेंकडा किती टक्के प्रमाण पडतें याबद्दल सालील आंकडे उद्बोधक वाटतील.

| बँकेचें नांव | एकूण ठेवींशीं ग्रॉस नफ्याचें शें. प्रमाण % | एकूण ठेवींशीं निव्वळ नफ्याचें शें. प्रमाण % | एकूण ठेवींशीं दिलेल्या व्याजाचें शें. प्रमाण % | एकूण ठेवींशीं स्टाफ सर्चाचें शें. प्रमाण % | एकूण ठेवींशीं इतर सर्चाचें शें. प्रमाण % |
|---|---|---|---|---|---|
| १ इंपीरिअल बँक | ३·६ | ·६ | ·८ | १·७ | ·५ |
| २ सेंट्रल बँक | ४·२ | ·८ | १·१ | १·८ | ·५ |
| ३ बँक ऑफ इंडिया | ४ | १·३ | ·८ | १·२ | ·७ |
| ४ बँक ऑफ महाराष्ट्र | ४·३ | ·९ | १·५ | १·३ | ·६ |
| ५ सांगली बँक | ६·५ | १·२ | २·९ | १·३ | १·१ |
| ६ युनिअन बँक कोल्हापूर | ६·५ | १·२ | २·५ | १·७ | १ १ |
| ७ रत्नाकर बँक | ५·६ | १·२ | २ | १·८ | ·६ |

(रत्नाकर बँकेचे चेअरमन, श्री. बी. बी. पाटील, ह्यांच्या अध्यक्षीय भाषणावरून).

## बँकांचे नफे : तुलनात्मक आकडे

(आकडे हजार रुपयांचे)

| बँकेचें नांव | १९५२ | १९५१ |
|---|---|---|
| १ इंपीरिअल | १,३३,३५ | १,२०,०८ |
| २ चार्टर्ड बँक ऑफ इंडिया | १,००,९१ | १,२५,४१ |
| ३ बँक ऑफ इंडिया | ७८,५१ | ७९,५५ |
| ४ पंजाब नॅशनल बँक | ३४,१२ | ३३,९७ |
| ५ युनायटेड कमर्शिअल बँक | २८,५४ | ३५,०३ |
| ६ नॅशनल सिटी बँक ऑफ न्यूयॉर्क. (हिंदी शाखा) | २७,६५ | २९,०३ |
| ७ बँक ऑफ बरोडा | २५,०९ | २८,०६ |
| ८ अलाहाबाद बँक | १८,३९ | १८,८९ |
| ९ बँक ऑफ म्हैसूर | १४,४९ | १७,४४ |
| १० इंडियन ओव्हरसीज बँक | १२,८७ | ११,४६ |
| ११ इंडियन बँक | ११,८७ | १६,८२ |
| १२ कॅनरा बँक | ७,५४ | ७,३९ |
| १३ युनियन बँक ऑफ इंडिया | ७,१८ | ८,९२ |
| १४ हिंद बँक | ६,७५ | ९,४८ |
| १५ देवकरण नानजी बँकिंग कंपनी | ६,१५ | ६,५७ |
| १६ बँक ऑफ महाराष्ट्र | २,५५ | २,४० |
| एकूण | ५,१४,६६ | ५,६०,५० |

वरील १६ बँकांपैकीं १३ बँकांना १९५१ पेक्षा १९५२ मध्यें कमी नफा झाला आहे, आणि सर्वांना मिळून एकूण ४६ लक्ष रु. नीं नफा कमी आहे.

## ३११ संस्थानिकांना ५½ कोटी रु. तनखा

भारतांतील 'अ' आणि 'ब' राज्यांतील ३११ संस्थानिकांना १९५२ मध्यें ५,३६,३७,००० रु. ची रक्कम 'प्रीव्ही पर्स' म्हणून भारत सरकारकडून मिळाली.

## दि रत्नाकर बँक लि.

वरील बँकेस १९५२ मध्यें ४९,१५४ रु. नफा झाला. रिझर्व्ह फंड १४,१०० रु., ऑर्डिनरी शेअर्सवर ३% करमाफ डिव्हिडंड १४,९३१ रु., इनकमटॅक्स देऊन पुढील सालचे हिशेबांत ओढण्यासाठीं १८,७७६ रु., अशी त्याची वाटणी करण्यांत आली. "१९५२ सालच्या मार्च महिन्यांतील मंदी व ऑगस्ट महिन्यांत कोल्हापुरांतील कांहीं बँकांबाबत निर्माण झालेला घबराट यांचा रत्नाकर बँकेवर कसलाही परिणाम न होता उलट अहवालाचे वर्षांत ठेवींमध्यें ७½ लाखांची वाढ झाली आहे." (चेअरमनः बी. बी. पाटील, बी. ए., एलएल बी. मॅनेजरः एल. एन. शहा, बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी.)

### संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ५,०३,३०० | रोस व बँकांत | ११,९७,५६६ |
| रिझर्व्ह व इतर फंड | ८५,९८१ | कॉलमनी | १,७५,००० |
| ठेवी | ४१,६४,४१२ | इनव्हेस्टमेंटस | १२,१९,९०६ |
| नफा | ४९,१५४ | कर्जें | २१,१८,५९९ |

## आयात आणि निर्यात करांचें उत्पन्न

१९५१–५२ मध्यें आयात आणि निर्यात करांपासून एकूण २३५·७१ कोटी रु. उत्पन्न मिळालें. त्या मागील वर्षाची ही रक्कम १५९·४६ कोटी रु. होती. मुंबई बंदरांत १९५०–५१ मध्यें जकात कराचे उत्पन्न ६३·७२ कोटी रु. मिळालें होतें तें १९५१–५२ मध्यें वाढून ८९·२९ कोटी रु. झालें. कलकत्ता, मद्रास आणि कोचीन या बंदरांच्या ठिकाणीं या वर्षांत मिळालेलें असें उत्पन्न अनुक्रमें १०७·८० कोटी रु., २९·२१ कोटी रु., व ९·५५ कोटी रु., होतें. या वर्षांतील मुंबई, कलकत्ता, या ठिकाणीं अनुक्रमें ५१·१० लक्ष रु., ४२ लक्ष रु., सर्च झाला असून मद्रास व कोचीन या दोन्ही ठिकाणीं मिळून १४·१० लक्ष रु. झाला.

१९५१–५२ मध्यें गोवा व दमण तसेंच पॉण्डीचरी आणि कारिकल या सरहद्दीवरील निरनिराळ्या नाक्यांवर मिळून अनुक्रमें ६२·५३ लक्ष रु., व ७·३८ लक्ष रु. जकात मिळाली.

## नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन लि.

वरील कंपनीस १९५२ मध्यें ६७·१४ लक्ष रु. ग्रॉस नफा झाला. घसारा, अंडररायटिंग सर्च, कर, ह्यांची तरतूद केल्यावर २८·१७ लक्ष रु. नफा उरला. १९५१ मध्यें १·२५ कोटी रु. ची विक्री झाली होती, ती १९५२ मध्यें २·११ कोटी रु. ची झाली. १९४७ व १९४८ वर्षांचें प्रेफरन्स डिव्हिडंड १९५१ च्या नफ्यांतून दिलें होतें. १९५२ च्या नफ्यांतून १९४९, १९५०, १९५१ व १९५२ चें प्रेफरन्स डिव्हिडंड दिलें जात आहे. पुढील वर्षी ऑर्डिनरी भागांस डिव्हिडंड मिळण्याचा संभव दिसतो.

## नातेवाईकांना कंत्राटें देण्यास बंदी

बिहार सरकारनें त्याच्या पब्लिक वर्क्स सात्याच्या अधिकाऱ्यांवर एक बंधन घातलें आहे, तें असें कीं त्यांनीं त्यांच्या नातेवाईकांना कंत्राटें देतां कामा नयेत. नातेवाईकाचें टेंडर सर्वांच्या टेंडरापेक्षा कमी असेल व त्यालाच तें कंत्राट मिळावें अशीच परिस्थिति असेल, तर मात्र त्याला कंत्राट देण्यास हरकत नाहीं. ह्याचा तपशील वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिला पाहिजे.

## बँक नोकरांची बडतर्फी : सुप्रीम कोर्टाचा निवाडा

पंजाब नॅशनल बँक व तिचे नोकर ह्यांचेमधील कित्येक तंटे भारत सरकारनें २१ फेब्रुवारी, १९५० रोजीं इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनलकडे सोपविलेले होते. ट्रायब्यूनलचें काम चालू असतांनाच, एप्रिल १९५१ मध्यें, बँकेच्या कित्येक शाखांतील नोकर संपावर गेले. त्यावरून, बँकेनें १५० नोकरांना कामावरून दूर केलें. ह्या बडतर्फीची चौकशी करण्यासाठी भारत सरकारनें २ जुलै, १९५१ रोजीं एका ट्रायब्यूनलची (श्री. पुरी) यांची नेमणूक केली. ह्या ट्रायब्यूनलनें ९ फेब्रुवारी, १९५२ रोजीं अवार्ड देऊन, बडतर्फ केलेल्या नोकरांना परत कामावर घेण्याचें कारण नाहीं असें ठरविलें. इंडस्ट्रिअल डिस्प्यूटस ॲक्टाचा २३ (ब) कलमाविरुद्ध नोकरांनीं बेकायदा संप केला, असें ट्रायब्यूनलचें मत झालें. बँक नोकरांना बडतर्फ करूं शकत होती, तरी ट्रायब्यूनलनें नोकरांना बडतर्फ ते अवार्ड ह्यांच्या मुदतीचा पगार व भत्ता दोन्हीं निम्म्या दरानें भरपाई म्हणून देवविला. ह्यावर अपील झालें.

संप बेकायदा होता, ह्या निवाड्याशीं कलकत्ता येथील अपेलेट ट्रायब्यूनल सहमत झालें, परंतु बँकेनें संपास माफी (कन्डोन) दिल्या कारणानें, संप बेकायदा होता ह्या मुद्यावर नोकरांना बडतर्फ करण्याचा मार्ग पंजाब नॅ. बँकेस मोकळा नव्हता, बडतर्फ केलेल्यांवर कोणताहि आरोप ठेवलेले नव्हते, त्यांच्या कृत्याबद्दल जाबहि विचारण्यांत आला नव्हता, असें अपेलेट ट्रायब्यूनला आढळून आलें. त्या नोकरांना पुनः कामावर घ्यावें किंवा नाहीं हें ठरविण्यापूर्वीं कांहीं मुद्यांवर त्याला माहिती हवी होती. लेबर अपेलेट ट्रायब्यूनलच्या ह्या हुकुमावर बँकेनें सुप्रीम कोर्टाकडे अपील केलें, तें त्या कोर्टानें मान्य केलें नाहीं. "बेकायदा संप बँकेनें कन्डोन केला किंवा काय, ह्या प्रश्नावर मत प्रदर्शित करण्याचें कारण नाहीं. बँकेनें संप कन्डोन केला नाहीं असें मानलें आणि नोकरांना बडतर्फ करण्यास बेकायदा संप हें पुरेसें कारण ठरविलें, तरी इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स ॲक्टाचें ३३ वें कलम असें सांगतें कीं, ट्रायब्यूनलपुढें प्रकरण चालूं असतांना कोणीहि मालक त्या प्रकरणाशीं संबंधित असलेल्या नोकरास ट्रायब्यूनलच्या लेखी परवानगीशिवाय काढूं शकतच नाहीं. प्रस्तुत प्रकरणीं, बँकेनें अशी परवानगी घेतलेली नव्हती. श्री. पुरी ह्यांच्या ट्रायब्यूनलपुढें काम चालूं असतांना, कामगारांनीं केलेला संप जर बेकायदा, तर ३३ व्या कलमाप्रमाणें त्या ट्रायब्यूनलची परवानगी न घेतां नोकरांची केलेली बडतर्फीहि बेकायदाच." असें सुप्रीम कोर्टानें त्याच्या निवाड्याचें समर्थन केलें.

### वीज-कपातीस तोंड देण्यासाठी जनरेटिंग सेट्स

वीज कपातीमुळें कोइमतूर येथील ३५ पैकी ३० गिरण्यांनीं वीज उत्पादन करण्यासाठी डिझेल जनरेटिंग सेट्स बसविले आहेत. गिरण्यांना लागणाऱ्या एकूण विजेपैकीं ३० ते ३५ टक्के वीज हे सेट्स तयार करूं शकतील. १६ एप्रिलपासून ७५% कपात अंमलांत आली. त्या कारणानें, जनरेटिंग सेट्स असणाऱ्या गिरण्या कामगारांना आतां महिन्यांतून १२ ते १५ एवढेच दिवस काम पुरवूं शकतील; बाकीच्या गिरण्या महिन्यांतून ६ ते ७ इतकेच दिवस काम पुरवूं शकतील.

### खादीचें उत्पादन व मध्यवर्ती सरकारची खरेदी

| वर्ष | खादीचें उत्पादन (चौ. वार) | खादीची सरकारी खरेदी (रुपये) |
|---|---|---|
| १९४९–५० | ७१,४४,०७० | २,५६७ |
| १९५०–५१ | ७२,८८,५०१ | ९६,२७५ |
| १९५१–५२ | ९१,११,२०४ | ६२,२८७ |

SAVE to help yourself and the NATION
WITH THE
HOME SAFE

THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
Branches: Dadar, Mahim, Poona & Belgaum

### कॅन्सरपासून बचाव करण्यासाठी संस्था

कॅन्सरच्या रोगावर उपचार करण्यासाठी इंडिअन कॅन्सर सोसायटी ही संघटना स्थापण्यांत आली आहे. आतां मद्रास येथेंहि तिची एक शाखा काढण्यांत येणार आहे. शाखेचें नांव ॲंटी-कॅन्सर असोसिएशन असें ठेवण्यांत आलें आहे. ह्या नव्या शाखेविषयीं लिहितांना डॉ. मुथुलक्ष्मी रेड्डी ह्यांनीं पुढील माहिती प्रसिद्ध केली आहे. भारतांत क्षयरोगाचे खालोखाल कॅन्सरनें दगावणाऱ्या लोकांची संख्या आहे. हा रोग बहुधा ३० ते ६० वर्षांच्या दरम्यान म्हणजे माणसाच्या अत्यंत उपयुक्त अशा आयुर्मानांत होतो. तरी पण त्याच्या निदानाची आणि त्यावरील उपचाराची आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर सोय नाहीं. ह्या रोगावर लवकर आणि योग्य उपचार झाल्यास तो बरा होऊं शकतो, असें तज्ज्ञांचें मत आहे. १९४६ सालीं भोर कमिटीनें असा अभिप्राय व्यक्त केला होता कीं पश्चिमेकडील देशांइतकाच ह्या रोगाचा भारतांतहि फैलाव झालेला आहे. स्वीडनमधील डॉ. वर्हेन हे नुकतेच भारतांत येऊन गेले. त्यांच्या मतानें, भारताच्या दर दहालाख लोकसंख्येमध्यें सुमारें २,५०० लोकांना कॅन्सरनें पछाडलेलें असतें. कॅन्सरविरुद्ध उपाय करण्याचे मुख्यतः तीन मार्ग भोर कमिटीनें सांगितले आहेत:—(१) हा रोग लवकर ध्यानांत येण्यासाठी आणि त्यावर उपचार करण्यासाठी लोकांना व डॉक्टर्सना शिक्षण देणें, (२) रोगाचा प्रतिकार करण्यासाठी जास्तींत जास्त उपयुक्त असे उपाय सुचविणें आणि (३) रुग्णालयांचा व प्रयोगशाळांचा उपयोग करून रोगाचें कारण, त्याचा प्रसार आणि त्याचा परिहार ह्यासंबंधीं संशोधन करणें. मद्रास येथें कॅन्सरविषयक मध्यवर्ती संघटनेची जी शाखा काढण्यांत येत आहे, ती वरील प्रकारचेंच काम करणार आहे.

**भारतांत येणारे परकीय प्रवासी**—१९५२ सालीं भारतांत आलेल्या परदेशीय प्रवाशांत ब्रिटनहून आलेल्या प्रवाशांची संख्या सर्वांत अधिक होती. एकूण २५,४४८ परकीय प्रवासी आले. त्यांपैकी ब्रिटिश ६,७६०, पाकिस्तानी ४,९४५ आणि अमेरिकन ४,८८९ होते. ह्या प्रवाशांना प्रवासासाठी भाड्यांत सवलती देण्यांत येत नाहींत. त्यांच्यापासून भारताला २·५ कोटी रुपयांची प्राप्ति होईल, असा अंदाज आहे.

**पगारांत स्वखुषीनें कपात**—ओरिसा असेंब्लीचे स्पीकर श्री. नंदकिशोरदास ह्यांनीं आपल्या पगारांत १५ टक्के कपात स्वखुषीनें करून घेतली आहे. त्यांना सध्यां १,००० रुपये पगार मिळतो. पगारकपातीचें कारण मात्र त्यांनीं दिलेलें नाहीं.

### भारतामधील नौकानयन

सध्या दिल्ली येथें भरविण्यांत आलेल्या रेल्वेच्या शतसांवत्सरिक प्रदर्शनांत निरनिराळ्या कारखानदारांनींहि आपले विभाग उघडले आहेत. त्यांत शिंथा स्टीम नॅव्हिगेशनचा विभाग विशेष पहाण्या सारखा आहे. ह्या विभागांत भारताच्या नौकानयनाचा इतिहास उभा करण्यांत आला आहे. भारतीय नौकानयनाचा प्रारंभ खिस्त शकापूर्वी २,५०० वर्षांपूर्वी झाला असें मानण्यास पुरावा आहे. मोहेन-जो दारो येथें प्राचीन संस्कृतीचे जे अवशेष सांपडले आहे त्यांत एका ल्हानशा बोटीचें कोरीव चित्र सांपडलें आहे. ह्या चित्राची छबी प्रदर्शनांत मांडण्यांत आली आहे. सांची येथील स्तूपावर अधिक मोठ्या अशा बोटीचें चित्र आहे, तेंहि प्रदर्शनांत मांडण्यांत आलें आहे. सांचीचा स्तूप खिस्तशकाच्या पूर्वी २०० वर्षें बांधण्यांत आला असावा असा अंदाज आहे. त्यानंतर अजंठा येथील भित्ति चित्रांच्या प्रतिकृति ठेवण्यांत आल्या आहेत. ह्या चित्रांत राजा विजय लंकेंत उतरतांना दाखविलेला आहे. हीं चित्रें खिस्त शकापूर्वी ५४३ वर्षांइतकीं जुनीं आहेत. सातव्या शतकांत भारतीय नौकानयनाची प्रगति एका बोटींतून ७०० उतारू नेण्यापर्यंत झाली होती. त्याच काळच्या युरोपीय बोटींतून अवघे २०० उतारू नेण्यांत येत असत. त्यानंरच्या काळांत मात्र भारतीय नौकानयन हळुहळु मागें पडत गेलें असें दिसतें. ब्रिटिश अंमल हिंदुस्थानांत रुजल्यावर सुद्धां भारतीय कुशल कामगार बोटी बांधीत असत. भारतीय व्यापाऱ्यांच्यासाठीं तर ते बोटी बांधीत असतच; पण ब्रिटिश व्यापाऱ्यांच्यासाठीं आणि खुद्द ब्रिटनच्या नाविक दलासाठींहि ते बोटी बांधीत असत. १८ व्या शतकांत ब्रिटनमध्यें औद्योगिक क्रांति झाल्यावर मात्र भारतीय नौकानयन मागासलें, हें उघडच आहे.

---

### पूर्व रचित घरें : ब्रिटनचा निर्यातीचा एक नवा धंदा

ब्रिटिश कारखानदार आपली निर्यात वाढविण्याचे कसून प्रयत्न करीत आहेत. ह्यासंबंधीं पूर्वरचित घरांचें उदाहरण लक्षांत घेण्यासारखें आहे. १९४९ सालीं ब्रिटननें ज्या पूर्वरचित घरांची निर्यात केली होती त्यांची किंमत सुमारें ८०,००० पौंड झाली होती. पण गेल्या वर्षी अशा घरांच्या निर्यातीची किंमत ७० लाख पौंडांपर्यंत वाढल्याचें दिसून आलें आहे. ब्रिटनचे जे उद्योगधंदे निर्यात करण्यासाठी मालाचें उत्पादन करतात त्यांत जहाजें बांधण्याचा धंदा आणि मोटारींचा धंदा हे दोन धंदे प्रमुख आहेत. पण आतां हा तिसरा धंदाहि महत्त्व पावूं लागेल अशीं चिन्हें दिसत आहेत. धंद्यांत जे कारखाने गुंतलेले आहेत त्यांनीं आपली साधनसामुग्री एकत्रित करावी आणि निर्यात करण्याची शक्ति वाढवावी अशी सूचना करण्यांत येत आहेत. असें झालें तर खाणीजवळ वसविण्यांत येणारें एखादें छोटेंसें सबंद नगरच वरील कारखाने सहज पुरवूं शकतील. पूर्वरचित घरांच्या १२ कारखान्यांनीं तद्विषयक एक प्रदर्शन नुकतेंच भरविलें होतें. प्रदर्शनांत कॉमनवेल्थ गटांतील ज्या राष्ट्रांना अशीं घरें पुरविण्यांत आलीं आहेत त्यांचीं छायाचित्रें आणि नकाशे मांडण्यांत आले होते. घरांचे निरनिराळे प्रकार प्रदर्शनांत दिसून येत होते. उष्णकटिबंधांत उपयुक्त ठरतील अशीं कांहीं घरें होतीं; तर कांहीं विशेष प्रकारच्या सामाजिक गरजा अगर रहाणी ह्यांना अनुरूप अशी बांधण्यांत आलेली होती. येत्या २७ तारखेला ब्रिटनमध्यें चालू सालचें औद्योगिक प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. त्या प्रदर्शनांत सुमारें १ एकर जागेंत पूर्वरचित घरांचे निरनिराळे नमुने मुद्दाम मांडण्यांत येणार आहेत.


१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन

१९५० मध्येंही रु. २६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम.

**वे स्ट र्न इं डि या**

विमा कंपनीनें

आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा

यासंबंधींची प्रचिती पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.

दर हजारी त्रैवार्षिक बोनस

| हयातीतील पॉलिसी | हयातीनंतरची पॉलिसी |
|---|---|
| रु. २७ | रु. ३३ |

कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठी

वेस्टर्न इंडियाची, निवड करा.

के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.

मॅनेजर

**वेस्टर्न इंडिया लाईफ**

**इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा.**

शाखा कचेरीः— शहर: १७९ बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें. कँप: केअर—ऑफ क्रेसवेल्स ईस्ट स्ट्रीट, पुणें-१

फोन नंबर— १४०२

**भोर स्टेट बँक लि.**

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंदे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. वृ. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. घंदुके.

सरकारी रोखे खरेदी—विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१—६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन. व्ही. पांडव, मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.